# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ३ रे अंक २१४ वा शुक्रवार दि.२६ जानेवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## केंद्र सरकार सर्वसामान्यांना दिलासा देण्याच्या तयारीत; आता लवकरच स्वस्त होणार खाद्यतेल



नवी दिल्ली : गेल्या वर्षभरापासून सामान्य जनता महागाईच्या आगीत होरपळत आहे. तसेच एप्रिल-मे मध्ये लोकसभा निवडणूक होत आहे. त्यामुळे या निवडणुकीपूर्वी खाद्यतेलाच्या दरात कपात करुन केंद्र सरकार ग्राहकांना दिलासा देण्याच्या तयारीत आहे. खाद्यान्न, डाळी, अन्नधान्य, मसाले आणि इतर अनेक पदार्थ महागल्याने स्वयंपाकघराचे बजेट पार कोलमडून गेले आहे.

केंद्र सरकार या कोलडमडेल्या बजेटला थोडा दिलासा देण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने केंद्र सरकारच्या ग्राहक मंत्रालयाने खाद्यतेल उत्पादक कंपन्यांना एक पत्र लिहिले आहे. सॉल्वेंट एक्स्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ इंडियाला जागतिक स्तरावरील किंमती आधारे खाद्यतेलाच्या भावात कपातीचे निर्देश देण्यात आले आहे.

खाद्यतेल व्यवसायामधील तज्ज्ञांच्या मते, यावेळी खाद्यतेलाच्या किंमतीत एकदमच कपात करणे शक्य नाही. पण टप्पाटप्याने हा निर्णय अंमलबजावणीत येईल. मार्च महिन्यापर्यंत खाद्यतेलाच्या किंमतीत कपातीचा शक्यता आहे. देशात मोहरीचे उत्पादन आता हाती येईल. त्यानंतर नवीन तेलाचा बाजारात पुरवठा होईल. तोपर्यंत किंमतीत कपात करणे शक्य नसल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अर्थात याविषयीची कोणतीही माहिति समोर आलेली नाही.

### महागाईवर नजर

केंद्र सरकार गेल्या काही दिवसांपासून खाद्य तेलाच्या किमती वाढू नये, यासाठी कसोशीने प्रयत्न करत असल्याचे दिसून येत आहे. गेल्या एक वर्षांहून अधिक काळापासून खाद्यतेलाच्या किमती भडकू न देण्याचा प्रयत्न केंद्र सरकारने केला आहे. त्यासाठी अनेक उपाय पण करण्यात आले आहे.

## पोलिसांनी परवानगी नाकारली, जरांगे पाटील म्हणतात



मुंबई-मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील लाखो मराठा बांधवांसह आज लोणावळा येथे पोहोचले आहेत. मुंबई येथील आझाद मैदानावर जरांगे यांचे आंदोलन नियोजित आहे. मात्र पोलिसांनी जरांगे यांच्या आंदोलनाला परवानगी नाकारली असल्याचं समोर आलं आहे.एकीकडे जरांगे लोणावळ्यात पोहोचले असतानाच, दुसरीकडे आंदोलनाला परवानगी नाकारण्यात आल्याने पुढं काय होणार याबाबत चर्चा सुरु झाल्या आहेत. अशातच आता स्वतः मनोज जरांगे पाटील यांनी याबाबत भाष्य केलं आहे.काय म्हणाले मनोज जरांगे पाटील ? लोणावळ्याहून मुंबईकडे कूच करण्यापूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी सरकारच्या शिष्टमंडळासोबत चर्चा केली. या चर्चेनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. पोलिसांनी आंदोलनाला परवानगी नाकारल्याबाबत विचारले असता, पोलिसांनी आझाद मैदानाच्या एका बाजूला आंदोलनास परवानगी दिली असून येथे स्टेज उभारण्याचे काम सुरु असल्याचं जरांगे पाटील यांनी सांगितलं.याबाबत आपल्याला मराठा कार्यकर्त्यांनी नुकतीच माहिती दिली असल्याचे देखील ते म्हणाले.दरम्यान, आझाद मैदानाचा आकार आंदोलन करण्याइतपत मोठा नसल्याचं कारण देत मुंबई पोलिसांनी जरांगे पाटील व त्यांच्या समर्थक आंदोलनकर्त्यांना परवानगी नाकारली असल्याचं वृत्त आहे.अशातच जरांगे पाटील यांनी मात्र परवानगी मिळाली असल्याचं बोलल्याने संभ्रम निर्माण झाला आहे.मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी बोलताना, आपण आझाद मैदानावर जाणार असल्याचं स्पष्ट केलं. पोलिसांनी परवानगी नाकारल्यास काय अशी विचारणा पत्रकारांनी केल्यानंतर, आझाद मैदानावर आंदोलनाबाबत आपण ठाम असल्याचे जरांगे पाटील म्हणाले.पोलिसांनी सुचवलं पर्यायी मैदान आंदोलनासाठी मनोज जरांगे पाटील यांना पोलिसांनी आझाद मैदान येथील परवानगी नाकारली आहे. मैदान छोटं असून आंदोलनासाठी योग्य नसल्याचं पोलिसांनी म्हंटल आहे. मुंबई पोलीस यांनी या आंदोलनासाठी खारघर येथील मैदान सुचवले असल्याचं वृत्त आहे.

## आ. कराड यांच्या उपस्थितीत नवमतदार संमेलनास मोठा प्रतिसाद
## युवकांच्या भवितव्यासाठी घराणेशाही नष्ट करा - प्रधानमंत्री मोदी





लातूर :- लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात आयोजित नवमतदार संमेलन मोठ्या उत्साहाच्या आणि जल्लोषपूर्ण वातावरणात भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत पार पडले या नव मतदार संमेलनास युवाशक्तीचा मोठा प्रतिसाद मिळाला. घराणेशाही पार्टीने कधीच दुसऱ्या तरुणांना पुढे येऊ दिले नाही तेव्हा तरुणांच्या भवितव्यासाठी येणाऱ्या काळातील निवडणुकीत घराणेशाहीच्या पार्टीला पराभूत करावे असे आव्हान देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांनी केले.

भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने २५ जानेवारी रोजी देशभर नवमतदार संमेलन आयोजित करण्यात आले होते. या सर्व संमेलनास दूर दृश्य प्रणालीद्वारे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांनी नव मतदारांशी संवाद साधला. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील नवमतदाराचे संमेलन भाजयूमोचे प्रदेश सचिव ऋषिकेश कराड यांनी लातूर येथील विश्व पॅलेस मंगल कार्यालयात आयोजित केले होते. या संमेलनास नवमतदारासह तरुणांनी मोठा प्रतिसाद दिला. याप्रसंगी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि जिल्ह्याचे खा. सुधाकर शृंगारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

नव मतदारांशी संवाद साधताना पंतप्रधान नरेंद्रजी मोदी म्हणाले की येणाऱ्या २५ वर्षाचे विकसित भारत देशाचे आणि आपले भवितव्य निश्चित करण्याची जबाबदारी नवमतदारावर आहे. विकासाला गती देण्यासाठी नव तरुणाच्या मतदानात मोठी ताकद आहे, स्पष्ट बहुमतातील स्थिर सरकार असेल तरच मोठे आणि योग्य निर्णय होऊ शकतात. केंद्र सरकारने अशक्य असणारी कामे शक्य करून दाखवली आहेत. मोदी है तो ग्यारंटी है असे सांगून केंद्र शासनाने घेतलेल्या विविध निर्णयाची सविस्तर माहिती दिली आणि येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भाजपाचे संकल्प पत्र कसे असावे यासाठी तरुणांनी सूचना कराव्यात असे आव्हान केले.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता असणारे देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वात स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच गोरगरीब, सर्वसामान्य माणसाला न्याय देण्याचे काम झाले असल्याचे बोलून दाखवले. गेल्या नऊ वर्षात देशाचा सर्वांगीण चौफेर विकास झाला. शेतकऱ्यांना, महिलांना आणि तरुणांना विविध योजनेच्या माध्यमातून विकासाच्या प्रवाहात आणले. देशाची शान आणि मान नरेंद्रजी मोदी यांनी जगात उंचावली. वर्षानुवर्ष अडगळीत पडलेले प्रश्न निकाली काढले अशा नेतृत्वाच्या पाठीशी नव मतदारांनी खंबीरपणे उभे राहुन भक्कम समर्थन दिले पाहिजे असे आव्हान भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी यावेळी केले.

प्रारंभी युवा नेते ऋषिकेश दादा कराड यांनी नव मतदार संमेलनाच्या योजना मागची भूमिका विशद करून तरुणांनी मोदी पच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांच्याशी थेट संपर्कात यावे असे आवाहन केले. या नवमतदार संमेलनास लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील नव मतदार युवाशक्ती हजारोच्या संख्येने उपस्थित होती. मोठ्या उत्साहाच्या वातावरणात झालेल्या या संमेलनात तरुणांनी नरेंद्र मोदी तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है !! यासह जय श्रीराम, जय जय श्रीराम, मोदी.. मोदी.. मोदी.. अशा जोश पूर्ण घोषणांनी सभागृह दणाणून सोडले होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला. या कार्यक्रमास भाजपाचे नवनाथ भोसले, अनिल भिसे, सतिष अंबेकर, वसंत करमुडे, भागवत सोट, सुकेश भंडारे, सुरज शिंदे, अमर चव्हाण, संजय ठाकूर, अशोक सावंत, रावि माकुडे, भागवत गिते, गोविंद देशमुख, गणेश तुरुप, प्रताप पाटील, ज्ञानेश्वर जूगल, विजय चव्हाण, किशोर काटे, सचिन लटपटे, सुभाष पवार, शिला आचार्य, शुभम खोसे, लक्ष्मण खलंग्रे, दिलीप पाटील, बाबुराव कस्तूरे, नरसिंग येलगटे, चंद्रकांत माने, कार्तिक गंभिरे यांच्यासह इतर अनेकजण नरेंद्र मोदी यांचे विचार ऐकण्यासाठी आवर्जून उपस्थित होते.

## दुय्यम निबंधक पदी विशाल जगदाळे यांची नियुक्ती



लातूर :- खरेदी - विक्री व्यवहार नोंद करणाऱ्या लातूर येथील दुय्यम निबंधक कार्यालयाचा कारभार नियमित प्रभारी दुय्यम निबंधकावरच चालत राहतो. खरेदी विक्रीचा व्यवहार जास्तीचा असल्याने तत्कालीन मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख यांनी एका दुय्यम निबंधक कार्यालय ऐवजी दोन कार्यालयाची मंजुरी दिली तेव्हापासून दुय्यम निबंधक एक आणि दोन कार्यालयाचा कारभार तेजीने चालत आलेला आहे. परंतु तो कारभार आजवर प्रभारी अधिकाऱ्यावरच अवलंबून होता आज रोजीला दुय्यम निबंधक कार्यालय -२ लातूर येथे लिपिक ते सहायक उपनिबंधक म्हणून कार्यरत राहिलेले आणि पुन्हा दुय्यम निबंधक म्हणून औसा येथे बदलून गेलेले विशाल जगदाळे हे पुन्हा लातूर येथे बदलून आल्याने खरेदी विक्री करणाऱ्या नागरिकासह दुय्यम निबंधक कार्यालयातील कर्मचाऱ्यासह मुद्रांक विक्रेते आणि खरेदी विक्री व्यवहारात मुंशी म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीमध्ये समाधान व्यक्त होताना दिसते आहे. नावातच विशाल असलेले विशाल जगदाळे यांचा कारभार न्यायिक व पारदर्शक आहे. त्यामुळेच वरिष्ठ अधिकाऱ्याने लातूर येथील खरेदी विक्रीचा व्यवहार लगबगिने तात्काळ व्हावा आणि विशाल अंतकरणाने खरेदी विक्री व्यवहारातील व्यक्ती समाधानी व्हावेत हीच अपेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांची असावे म्हणून ते सक्षम अधिकारी म्हणून विशाल जगदाळे हे लातूर - औसा आणि औसा - लातूर हा खरेदी विक्रीचा व्यवसाय शासनाच्या नियमांच्या आधीन राहून करतात हेच त्यांच्या बदलीतून लातूर येथे आले असावे हे त्यांचे गुपित आहे. अशी चर्चा होताना दिसते आहे.

## आयोगाच्या वतीने घरोघरी सर्वेक्षणास येणाऱ्या प्रगणकांना कुटूंब प्रमुखांनी घरी थांबून माहिती द्यावी -तहसीलदार डॉ. मृणाल जाधव.





किनवट.ता.प्र.शेख शौकात : राज्य मागास आयोगाच्या वतीने ता. २३ ते ३१ जानेवारी दरम्यान मराठा समाजाचे सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी तालुक्यातील प्रत्येक गावात घरोघरी सर्वेक्षण करण्यासाठी येणाऱ्या प्रगणकांना कुटूंब प्रमुखांनी घरी थांबून आपली माहिती द्यावी, तसेच गाव पातळीवरील सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी प्रगणकांना सर्वेक्षणासाठी सर्वतोपरी सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी केले.

रविवारी (ता.२१) येथील तहसील कार्यालयात आयोजित प्रगणकांच्या सर्वेक्षण प्रशिक्षणात मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या. मंचावर उपस्थित असलेले नायब तहसीलदार अनिता कोलगणे व गट शिक्षणाधिकारी ज्ञानोबा बने यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. पुढे बोलतांना तहसीलदार डॉ. जाधव असे म्हणाल्या की, युद्धपातळीवर होणाऱ्या या सर्वेक्षणासाठी तालुक्यातील सर्व कार्यालयाचे विभाग प्रमुख हे नियंत्रण अधिकारी असून ते प्रत्येक गावात होणाऱ्या सर्वेक्षणाची नियमीत पाहणी करतील. गाव पातळीवरील सर्व अधिकारी-कर्मचारी ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहायक, पोलीस पाटील, कोतवाल यांनी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या प्रगणकांना सर्वतोपरी सहकार्य करावे. सर्वेक्षणा दरम्यान कुटुंब प्रमुखांनी घरी थांबुन आपली माहिती प्रगणकांना द्यावी.

राज्य शासनाच्या मराठा समाजाचे सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगामार्फत ता. २३ जानेवारी २०२४ ते ता. ३१ जानेवारी २०२४ या कालावधीत किनवट तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात सर्वेक्षण करुन माहिती गोळा करण्यात येणार असून सदर कामाच्या अनुषंगाने पर्यवेक्षक व प्रगणकांसाठी तालुकास्तरावर प्रशिक्षण देण्यात आले.

तालुक्यासाठी १६ पर्यवेक्षक व २३५ प्रगणक नियुक्त करण्यात आले असूनपहिल्या सत्रात दुपारी १२ ते २ या वेळेत ११९ व दुसऱ्या सत्रात दुपारी २.३० ते ४ .३० या वेळेत ११६ प्रगणकांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. यावेळी सर्वेक्षण ॲप बाबत संदीप पाटील यांनी माहिती दिली. उत्तम कानिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्रशिक्षणाच्या यशस्वितेसाठी नितीन शिंदे, इनामदार व देवकते आदिंनी परिश्रम घेतले.

## संपादकीय....

# सामाजिक न्यायासाठी लढलेला जननायक

जननायक कर्पूरी ठाकूर यांची आज जन्मशताब्दी आहे. सामाजिक न्यायासाठीच्या त्यांच्या अथक प्रयत्नामुळे कोट्यवधी लोकांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पडला. कर्पूरीजींना भेटण्याची संधी मला कधी मिळाली नाही; पण त्यांचे निकटवर्ती कैलाशपती मिश्रा यांच्याकडून मी त्यांच्याबद्दल खूप ऐकलं आहे. ते नाभिक या मागासलेल्या समाजातील होते. अनेक अडथळ्यांवर मात करत त्यांनी मोठे यश प्राप्त केले आणि सामाजिक उन्नतीसाठी काम केले. जननायक कर्पूरी ठाकूर यांचे जीवन साधेपणा आणि सामाजिक न्याय या दुहेरी स्तंभांभोवती गुंफले आहे. अखेरच्या श्वासापर्यंतची त्यांची साधी राहणी आणि नम्र स्वभाव सर्वसामान्यांच्या स्मृतीत कायम राहिला. त्यांच्या साधेपणाचे गुणगान करणारे अनेक किस्से आहेत. ठाकूर यांनी आपल्या मुलीच्या लग्नासह कोणत्याही वैयक्तिक बाबींसाठी स्वतःचेच पैसे खर्च करणे नेहमी कसे पसंत केले, याबाबतच्या आठवणी त्यांच्या सहवासातील अनेक जण सांगतात. बिहारचे मुख्यमंत्री असताना राजकीय नेत्यांसाठी वसाहत बांधण्याचा निर्णय घेण्यात आला; पण त्यांनी स्वत:साठी याकरिता कोणतीही जमीन किंवा पैसा घेतला नाही. १९८८ मध्ये त्यांचे निधन झाले, तेव्हा अनेक नेते श्रद्धांजली वाहण्यासाठी त्यांच्या गावाला गेले होते, तेव्हा त्यांच्या घराची अवस्था पाहून सर्वांना अश्रू अनावर झाले. एवढ्या मोठ्या माणसाचे घर इतके साधे कसे असू शकते? १९७७ मध्ये ज्यावेळी त्यांनी बिहारचे मुख्यमंत्री म्हणून नुकताच पदभार स्वीकारला होता, त्यावेळी दिल्ली आणि बिहारमध्येही जनता दलाचे सरकार सत्तेवर होते. त्यावेळी लोकनायक जयप्रकाश नारायण यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी जनता दलाचे नेते बिहारमध्ये जमले होते. प्रमुख नेत्यांच्या मांदियाळीत मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर फाटका सदरा घालून फिरत होते. आपल्या अनोख्या शैलीत चंद्रशेखर यांनी लोकांना काही पैसे दान करण्याचे आवाहन केले. त्या निधीतून कर्पूरीजी एक नवीन सदरा विकत घेऊ शकतील, असे वाटले होते. त्यांनी पैसे तर स्वीकारले, मात्र ते 'मुख्यमंत्री सहायता निधी'ला दान करून टाकले.जननायक कर्पूरी ठाकूर यांना सामाजिक न्यायाप्रती विशेष आस्था होती. त्यांच्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीत एका अशा समाजाच्या निर्मितीसाठी त्यांनी कार्य केले जिथे प्रत्येकाला समान न्याय मिळेल. त्यासाठी संसाधनांचे समान वाटप केले. प्रत्येक व्यक्तीला समान संधी उपलब्ध असतील हे पाहिले. त्यांना भारतीय समाजातल्या व्यवस्थेतील असमानता दूर करायची होती. आपल्या आदर्श आणि मूल्यांप्रती त्यांची निष्ठा इतकी दृढ होती की, ज्या काळात काँग्रेस पक्ष सर्वव्यापी होता, अशा युगात राहूनदेखील त्यांनी स्पष्टपणे काँग्रेसविरोधी भूमिका घेतली. याचे कारण काँग्रेस आपल्या मूलभूत तत्त्वांपासून विभक्त झाली आहे, याची त्यांना फार लवकर जाणीव झाली होती. त्यांची राजकीय कारकीर्द १९५० च्या दशकाच्या सुरुवातीस सुरू झाली आणि तेव्हापासून ते कामगारवर्ग, मजूर, लहान शेतकरी आणि तरुणांच्या संघर्षांना मोठ्या हिमतीने आवाज देत राहिले आणि विधिमंडळाच्या सभागृहातले एक सामर्थ्यवान प्रतिनिधी झाले. शिक्षण हा विषय त्यांच्या आस्थेचा होता. गरिबांच्या शैक्षणिक सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी अथक कार्य केले. विद्यार्थ्यांना त्यांच्या स्थानिक भाषांमध्ये शिक्षण द्यावे या विचारांचे ते पुरस्कर्ते होते; ज्यामुळे लहान शहरे आणि खेड्यातील लोकशिक्षण घेऊन जीवनात यशोशिखरावर पोहोचतील. मुख्यमंत्री असताना त्यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठीही अनेक उपाययोजना केल्या.समावेशक समाजासाठी पाया लोकशाही, वादविवाद आणि चर्चा हे कर्पूरीजींच्या व्यक्तिमत्त्वाचे अविभाज्य घटक होते. लहानपणी त्यांनी भारत छोडो आंदोलनात स्वतःला झोकून दिले, तेव्हा त्यांच्यातील हे धैर्य दिसले. त्यांनी आणीबाणीचा सर्वशक्तिनिशी प्रतिकार केला तेव्हा ते धैर्य पुन्हा दिसून आले. जेपी, डॉ. लोहिया आणि चरणसिंह यांच्यासारख्यांनीही त्यांच्या अद्वितीय अशा यथार्थ कामगिरीची प्रशंसा केली.मागासवर्गीयांना त्यांचे हक्काचे प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी प्रयत्न करणारे आणि त्यासाठी कृतियंत्रणा बळकट करणारे कर्पूरी ठाकूर कायम स्मरणात राहतील, याचे कारण ही त्यांची सर्वात मोठी कामगिरी होती. त्यांच्या या निर्णयाला प्रचंड विरोध झाला; पण ते कोणत्याही दबावापुढे झुकले नाहीत. त्यांच्या नेतृत्वाखाली धोरणे अंमलात आणली गेली, जिथे एखाद्याचा जन्म एखाद्याचे भाग्य ठरवत नाही, या आधारावर या धोरणांनी अधिक समावेशक समाजासाठी पाया घातला. ते समाजातील सर्वात मागासलेल्या स्तरातील होते; पण त्यांनी सर्व लोकांसाठी काम केले. त्यांच्यामध्ये कटुतेचा कोणताही मागमूस नव्हता. हे वैशिष्ट्य त्यांना खरोखर महान बनवते.गेली दहा वर्षे आमचे सरकार जननायक कर्पूरी ठाकूर यांच्या मार्गावर चालले आहे. आमच्या योजना आणि धोरणांमध्ये परिवर्तनशील सशक्तीकरण आणले आहे. कर्पूरीजींसारख्या काही नेत्यांना वगळून सामाजिक न्यायाची हाक केवळ राजकीय घोषणापुरती मर्यादित राहिली, ही आपल्या राजकारणाची सर्वात मोठी शोकांतिका आहे. कर्पूरी ठाकूर यांच्या दृष्टिकोनाने प्रेरित होऊन आम्ही त्यांचा दृष्टिकोन प्रभावी शासकीय प्रारूप म्हणून अंमलात आणले.

# प्रजासत्ताक, सार्वभौम भारताचा अमृत महोत्सव..

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला असला तरी, तो कसा चालवला जाणार यासाठी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटना स्वीकृत केली आणि २६ जानेवारी १९५० रोजी २१ तोफांच्या सलामीसह भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी ध्वजारोहण करुन भारताला प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून घोषित केले, अमंलबजावणी झाली. तेव्हापासून आपला देश सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही राष्ट्र म्हणून ओळखला जातो. त्यामुळे या दिवसाचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन, राष्ट्रीय सण साजरा करण्यापुरते मर्यादित न राहता देशहितकारक कार्यासाठीही आपण कटीबद्ध, प्रामाणिक असले पाहिजे. भारताची राज्यघटना हा देशाचा सर्वोच्च कायदा, राष्ट्रीय ग्रंथ असल्यामुळे मुलभूत राजकीय संहिता, न्याय व्यवस्था, प्रशासन, संरचना, कार्यपध्दती, अधिकार आणि सरकारी संस्थांची कर्तव्ये, मुलभूत अधिकार, तसेच नागरिकांची कर्तव्ये अशी विविध मार्गदर्शक तत्वे निर्धारित करणारी चौकट मांडतो. संविधानाच्या चौकटीत राहूनच एकूण राज्यकारभार चालतो. आधुनिक अखंड भारताचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपल्या भारत देशाला सम्यक संविधान अर्पण केले आणि २६ जानेवारी १९५० पासून, पुर्वीची सर्व जाचक व्यवस्था, ब्रिटिश कायदे संपुष्टात येऊन भारतात संविधानिक प्रजासत्ताक कार्यप्रणाली अस्तित्वात आली. बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व धर्मनिरपेक्ष या संविधानिक तत्वांवर देशाची एकता, अखंडता आणि राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याचे महान, अनमोल कार्य केले, माणसाला माणूस म्हणून जगण्याचे सन्मानपुर्वक मुलभूत अधिकार मिळाले, सर्व भारतीय नागरिकांना समान



हक्क आणि सर्वाधिकार मिळाले. मात्र, यावर्षी अमृतमहोत्सवी प्रजासत्ताक दिन असल्यामुळे शासकीय, राजकीय व सामाजिक पातळीवर देशभरात विविध उपक्रमांचे आयोजन व्हायला पाहिजे होत, पण तसे काहीच वातावरण दिसत नाही. काही घटना घडल्यामुळेच सर्वसामान्य माणसाला आणि राजकीय पक्ष तसेच राजकारण्यांचा आता संविधानावर विश्वास बसला, महत्व कळायला लागले असले तरी त्यांनी अंगिकारल्याचे दिसून येत नाही. ज्यांना संविधान आणि लोकशाही मान्य नव्हती, तेच आता विश्वासाहर्ता दाखवित आहेत. काही तरी अडचण, प्रतिकुल परिस्थिती निर्माण झाल्यावरचं संविधान व लोकशाहीची गरजेपुरती आठवण काढून कसे चालेल ? धर्मांध, गोंडस भावनिक मानसिकतेमुळे ज्यांच्या मेंदूला संविधान विरोधी सुज चढली आहे त्यांनी कितीही नाकाने कांदे सोलण्याचा प्रयत्न केला तरी, आपल्या भारत देशाला संविधानिक लोकशाही शिवाय पर्यायच नाही हे लक्षात घेतल पाहिजे. २६ जानेवारी १९५० पासून प्रजासत्ताक दिनी संविधानिक लोकशाही कार्यप्रणाली अस्तित्वात आली असतांना अमृतमहोत्सवी वर्षात लोकशाही संविधानिक कार्यप्रणालीचा राष्ट्रीय उत्सव फक्त शासकीय पातळीपर्यंतच मर्यादित न ठेवता त्याला व्यापक स्वरुप द्यायला पाहिजे होत. प्रसिद्धी माध्यमांच्या माध्यमातून, बॅनरव्दारे जनजागृती करुन विविध संविधानिक उपक्रम, योजनांची माहिती द्यायला पाहिजे होती. मुंबईत भारतीय लोकसत्ताक संघटना सोडली तर, संविधान रॅलीच आयोजन दिसून येत नाही. जगातील सर्वात मोठी आदर्श, सर्वसमावेशक लोकशाही म्हणून भारतीय लोकशाहीला जगात ओळख असतांना अमृतमहोत्सवी वर्षात विविध उपक्रमांव्दारे जल्लोष, गौरव करण्यात एवढी अनास्था का ? भारतात अनेक जाती, धर्म, रुढी, परंपरा, पंथ, वर्ण व्यवस्था, विषमता अशी विभिन्न परिस्थिती असतांना देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या संविधानिक तत्वांवर देशाची एकता, अखंडता आणि राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याचे महान, अनमोल कार्य केले, सम्यक संविधान देऊन लोकसत्ताक भारताच्या लोकशाहीचा पाया मजबूत केला. म्हणूनच आपला भारत देश अखंड, सार्वभौमत्व आहे. बाबासाहेबांनी घटनेत सर्वचं समाजातील घटकांसाठी ठोस तरतूद करुन ठेवली आहे. या युगपुरुषांने अस्पृश्यांनाचं नव्हे तर, स्पृश्यांनाही पुनीत केले. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून भारतीयांवर केलेल्या अनंत उपकारामुळेच, भारतीय संविधानाला जगात वेगळा आयाम मिळाला आहे. यासाठी आपण संविधाना प्रती कृतज्ञ असायला पाहिजे की कृतघ्नपणा दाखविला पाहिजे ? पण, त्याची जाणीव न ठेवता आजही काही राजकीय संघटनांना, समाज घटकांना नेहमीचं लोकशाही व संविधानाबद्दल तिटकारा, पोटशूळ आणि कृतघ्नपणाच असल्याचे दिसून येते. जसा आरक्षणाचा फायदा घेत असल्याची जाणीव नसलेली काही मंडळी आपण आरक्षण घेतच नाही असा आविर्भाव दाखवतात, तसाच काहीसा हा प्रकार आहे. ७५ वर्षानंतरही आज आपल्या देशासमोर अनेक आवाहने, अनेक प्रश्न, समस्या आहेत. त्या आवाहनांचा, प्रश्नांचा सामना करतांना बहुमताच्या जोरावर किंवा सत्तेचा दुरुपयोगाने एखाद्या पक्षांने एकाधिकारशाहीने कायद्याला कमजोर करुन, वटहुकूम काढून अथवा जाती धर्माच्या नावावर भावनिक राजकारण करुन संसदीय लोकशाहीची गळचेपी केल्यास तीच अस्तित्व धोक्यात यायला वेळ लागणार नाही. त्यामुळे, ज्या तत्वांवर लोकशाही टिकून आहे ती स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व धर्मनिरपेक्षता ही मुलतत्वे पायदळी तुडवली जाणार नाहीत, देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण होणार नाही याचीही सर्वांनी दक्षता घेतली पाहिजे. संविधानाच्या माध्यमातून देशाचे राखलेले अखंडत्व अबाधित राखणे हे प्रत्येक भारतीयाचे, राजकीय पक्षांचे आणि सत्ताधार्यांचेही आद्य कर्तव्य आहे. राजकारणात धर्म हा तर कळीचा व भावनेचा आणि प्रतिष्ठेचा मुद्दा होऊन बसला आहे. पण, धार्मिक उन्माद हा एक दिवस देशाला विनाशाकडे घेऊन तर जाणार नाही ना अशी भिती वाटते. आज आपल्या भारत देशाला जाती, धर्माची नाही तर, संविधानानिष्ठ, राष्ट्रप्रेमी भारतीयांची नितांत गरज आहे. संविधानांने प्रत्येक व्यक्तीला श्रध्दा व उपासनेचा अधिकार दिला आहे. त्यामुळे प्रत्येकांने आपली जात, धर्म घरात ठेवून, बाहेर भारतीयचं म्हणूनचं जगल, वागल, कार्यरत राहिल पाहिजे. आपल्या शेजारील धर्मांध पाकिस्तान देशाची आज काय अवस्था आहे ? त्यामुळे, बाबासाहेबांनी प्रस्थापित केलेली मानवी मुल्ये आत्मसात केली तर, भारतीय म्हणूनचं सामाजिक सलोखा निर्माण होऊन, कोण्या राजकारण्याला आणि पक्षांना भावनिक, जाती, धर्माच्या आधारे सोयीचं राजकारण करता येणार नाही. त्यासाठी संविधानाची प्रामाणिकपणे अंमलबजावणी झाल्यास, संविधानिक लोकशाही शासन प्रणाली अधिक सक्षम, प्रगल्भ होईल. गेली ७५ वर्षे संविधानिक लोकशाहीच्या माध्यमातून आपण विकासाकडे आणि जागतिक स्पर्धेत दमदार वाटचाल करीत आहोत. त्यामुळे, प्रत्येक भारतीयांने २६ जानेवारी हा दिवस सार्वजनिक सुट्टी म्हणून एन्जॉय न करता किंवा त्या दिवशी इतर असंविधानिक कार्यक्रम साजरे न करता, त्याच्या प्रती कृतज्ञता बाळगून २६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिन अभिमानाने राष्ट्रीय सण म्हणून सर्वत्र मोठ्या जल्लोषात साजरा झाला पाहिजे, त्या दिवशी विविध उपक्रम राबविले पाहिजेत, संविधानाचा सन्मानपुर्वक गौरव, संविधानिक मुल्यांचा जागर, वाचन केल पाहिजे, संविधान रॅली निघाल्या पाहिजेत, लोकशाही पुढील आवाहनांवर चर्चा घडवून आणल्या पाहिजेत, शोषित, वंचित, दुर्बल, दुर्लक्षित समाज घटकांच्या उन्नतीसाठी विकास आराखडा तयार करुन प्रत्येक घरात संविधान पोहविले पाहिजे. आपण संसदीय लोकशाही कार्यप्रणालीत संविधानाची मुल्ये रुजवली तरचं भारतात एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही टिकून राहील आणि भारताचे प्रजासत्ताक ठिकून राहील. कारण, संसदीय लोकशाही राज्य प्रणाली हीच सर्वोत्तम राज्य प्रणाली आहे. संविधानाच्या प्रास्ताविकेत न्याय, व्यक्ती, स्वातंत्र्य, समानता, व्यक्तीची प्रतिष्ठा, राष्ट्राची एकता, बंधुता या मानवी मुल्यांचा घटनाकारांनी उल्लेख, पुरस्कार केला आहे. ही घटना आम्ही स्विकारली, ही किती अभिमानास्पद बाब आहे. म्हणून, फक्त गरजेपुरते आणि सोयीच्या राजकारणासाठी संविधानावर स्तुतीसुमनांची उधळण न करता, नतमस्तक होण्याचा दिखाऊपणा न करता, संविधानाची प्रामाणिक आणि काटेकोरपणे कशी अंमलबजावणी होईल यासाठी प्रयत्नशील, जागृत राहून त्याचा अभ्यासक्रमात तसेच लोकाभिमुख करुन जनाधार मिळवून दिला तरच, लोकशाही प्रजासत्ताक प्रणाली चिरकाल जीवंत राहिल. कारण जाती, धर्म, प्रांतापेक्षा स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय तसेच देशाची एकात्मता, अखंडता, धर्मनिरपेक्षतेवरच संविधानिक लोकशाही सक्षम होईल. आम्ही भारताचे लोक हीचं आपली ओळख आणि राष्ट्रीयत्व निर्माण झाले पाहिजे. देशातील सामाजिक सलोखा, देशाची एकता, एकात्मता जोपासली जाऊन, धर्मनिरपेक्ष ही जागतिक ओळख जपली गेली पाहिजे. जाती, धर्माच्या नावाखाली देशात जी विचारधारा, अराजकता निर्माण होत आहे ती भविष्यात देशाला घातक आहे. विद्वेष, हिंसक, विषमतेपेक्षा समतेच राज्य महत्वाच आहे. त्यामुळे संविधानाला धक्का लागला तर, घटनाकारांनी महत् प्रयासाने उभारलेला लोकशाहीचा हा डोलारा उध्वस्त व्हायला, राष्ट्रीय एकात्मता धोक्यात यायला वेळ लागणार नाही. बाबासाहेबांनी देशाला एक सम्यक संविधान देऊन, प्रजासत्ताक भारताच्या लोकशाहीचा पाया मजबूत केला आहे त्याचं अखंडत्व प्रामाणिकपणे जपण्यासाठी, राखण्यासाठी आपण प्रतिज्ञा केल्यास राष्ट्र भावना अधिक उजळून निघेल.

****************

– मिलिंद कांबळे, चिंचवलकर

# प्रजासत्ताक दिन म्हणजेच स्वतंत्र भारताची नियमावली.

२६ जानेवारी संविधानाचा व नियमांचा आधारस्तंभ आहे.१५ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु स्वातंत्र्यानंतर संविधान, देशाची नियमावली असने गरजेचे असते.कारण कोणत्याही कार्याकरीता पुढे पाऊल टाकण्यास कायद्याच बंधन असने गरजेचे आहे.२६ जानेवारी१९५० रोजी देशाची राज्यघटना लागु झाली.त्यानिमित्याने भारतातील प्रत्येक नागरिक मोठ्या उत्साहाने प्रजासत्ताक दिन साजरा करीत असतो.कारण प्रजासत्ताक म्हणजे लोकांव्दारे लोकांसाठी शासन. भारतात जात,धर्म,पंथ,वंश,गरीब–श्रीमंत, व्देष या संपूर्ण गोष्टी बाजूला ठेवून गुन्या–गोविंदाने प्रजासत्ताक दिवस वेगवेगळ्या संस्कृतीच्या माध्यमातून मोठ्या उत्साहाने साजरा करतात. २६ जानेवारी१९५० रोजी डॉ राजेंद्र प्रसाद यांची लॉर्ड माउंट बॅटन(गव्हर्नर जनरल) यांच्या जागी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड झाली.२६ जानेवारीच्या निमित्ताने दरवर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीतील राजपथावर राष्ट्रध्वज फडकवला जातो. आपण ७४ वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत आहोत.मुख्यत्वे करून २६ जानेवारीला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना लागु करण्यात आली. त्यामुळे स्वतंत्र भारतासाठी हा मोठा आणि गौरवाचा दिवस मानल्या जातो.भारताला स्वतंत्र होऊन ७७ वर्षे झाली असली तरीही आजही देशात आपल्याला गुन्हेगारी, भ्रष्टाचार, बँक घोटाळे,झुंड बळी, जातीयवाद, हिंसाचार, यांच्याशी आजही आपण लढतोय ही स्वतंत्र भारतासाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.अशा गुन्ह्या विरूद्ध सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे. कारण देश स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधी, भगतसिंग, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, झाशीची राणी, लाला लजपतराय, इत्यादीसह लाखो स्वतंत्र शुरविरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उदयास आला.भारताच्या थोर महात्म्यांना भारत स्वतंत्र करण्यासाठी दोन नद्यांचा उगम झाला एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच भारतीय स्वातंत्र्यलढा उभा झाला. याकरिता आपल्याला १५ ऑगस्ट१९४७ उजाडण्यासाठी तब्बल १५० वर्षे लागली.१५० वर्षांच्या काळातील स्वतंत्र विरांचे बलीदान व्यर्थ जावु नये व त्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना अस्तित्वात आणली.यात मुख्यत्वेकरून डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल,पंडित जवाहरलाल नेहरूसह अनेक थोर महात्म्यांचा सिंहाचा वाटा आहे.परंतु दु:खाची गोष्ट म्हणजे गेल्या ३० वर्षांपासून देशात भ्रष्टाचार,करोडोचे घोटाळे, बलात्कार, निवडणुकांमध्ये जातीयवाद याला मोठ्या प्रमाणात उत आल्याचे पहायला मिळते.ही शहिद विरांच्याप्रती अत्यंत दु:खद व चिंताजनक बाब आहे. आपल्या पुर्वजांनी व देशाच्या स्वतंत्र संग्राम



सेनानींनी आणि बहादुर विरांनी घर–दार, परीवार या संपूर्ण गोष्टी बाजूला सारून व त्याग करून स्वातंत्र्याच्या अग्नी कुंडात उडी घेतली व लाखोंच्या संख्येने बलीदान दिले. परंतु आपली शोकांतिकाच म्हणावी लागेल की आपण भारत स्वतंत्र होऊन ७७ व्या वर्षीत पदार्पण करीत आहोत तरीही भारतातील भ्रष्टाचार थांबलेला नाही. आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांजवळ, पुंजीपतीं,वॉलीउडक्षेत्र व भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांजवळ वाममार्गाने कमवीलेली करोडोंची संपत्ती आजही आहे. ही संपत्ती एकत्र केली तर भारताला तब्बल १० वर्षे कोणाही जवळुन कर्ज घ्यावे लागणार नाही व गरीबी संपुष्टात येवु शकते आणि देश सुजलाम–सुफलाम होण्यास मोठी मदत मिळेल.याकरिता भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट राजकीय पुढारी ही देशाला लागलेली कीड आहे ही कीड जळामुळासकट नष्ट व्हायला हवी व यावर आळा बसायला हवा.आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल–अचल संपत्ती दाबुन ठेवल्याने व चलनात नसल्याने देशातील गरीब वर्ग गरीबांच्या खाईत जात आहे तर श्रीमंत वर्ग श्रीमंत होत आहे व देशाच्या विकासामध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे.यामुळेच देशात महागाई व बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते.भारताचे प्रजासत्ताक दिनाचे ७४ व्या वर्षाचे औचित्य साधून देशातील संपूर्ण भ्रष्टाचाऱ्यावर कठोर कारवाई करून त्यांनी वाममार्गाने कमवीलेला पैसा सरकारने आपल्या तिजोरीत जमा करावा.यामुळे देशाचा विकास, बेरोजगारीची समस्या, महागाई यावर आळा घालण्यासाठी मोठी मदत होईल व देश भरभराटीला येईल.याचे स्वागत आपले पुर्वज,शहीद व स्वतंत्र सेनानी अवश्य करेल व त्यांच्या स्वतंत्र लढ्याला दिलासा अवश्य मिळेल हीच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शहिदांना आदरांजली ठरेल.देशात वाढते प्रदूषण व ग्लोबल वार्मिंगचा धोका पहाता.प्रजासत्तक दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी.याकरीता शाळा, कॉलेज, संपूर्ण सरकारी क्षेत्र, राजकीय पुढारी, सामाजिक संघटना यांनी पुढाकार घ्यायला हवा.यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होईल व प्रदूषणावर मात करण्यासाठी मोठी मदत मिळेल.भारतीय शहिदांची व शुरविरांची गाथा अबाध्य आहे.त्यांच्या आशीर्वादानेच आपण आज मोकळा श्वास घेत आहोत.जय हिंद!

**************

**लेखक**

**रमेश कृष्णराव लांजेवार**

**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर) मो. नं.९९२१६९०७७९,नागपूर.**

# अभ्यास करायचा की आंदोलनेच ?

गणेश काळे हा बीड जिल्ह्यातील एक बेरोजगार तरुण. गेल्या पाच वर्षांपासून त्याची शासकीय नोकरीसाठी पायपीट सुरू आहे. स्पर्धा परीक्षेच्या पूर्वतयारीसाठीचा खर्च मोठा असतो. तेवढी ऐपत नाही म्हणून गणेशने सारे लक्ष सरळ सेवा भरतीवर केंद्रित केलेले. राज्यात जिल्हा परिषद व तलाठी भरती जाहीर झाल्यावर त्याने फुटपाथवर दुकान चालवणाऱ्या भावाकडून ३० हजार रुपये उसने घेतले व अनेक ठिकाणी अर्ज केले. पोलीस भरतीसाठी तो सहा जिल्हे फिरला. पण पोलीस भरतीसाठी शरीरयष्टी योग्य नसल्याने त्याची संधी हुकली. पोलीस नाही तर आता तलाठी तरी व्हायचेच म्हणत त्याने कसून अभ्यास केला. परीक्षेच्या काळात पेपरफुटीच्या बातम्यांनी तो अस्वस्थ होताच, तरीही त्याने मन लावून परीक्षा दिली. पण निकालानंतर त्यातही घोळ झाल्याचे दिसताच अस्वस्थ झालेल्या गणेशने शेतात जाऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. आजूबाजूचे लोक धावले आणि त्यांनी त्याला गळफास घेण्यापासून परावृत्त केले. गणेशला वडील नाहीत. आई शेतमजुरी करते. भावाने उसनवारीसाठी तगादा लावलेला. पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या गणेशसमोर आता मोठा अंधार पसरला आहे.लखन खटाणे हासुद्धा बीडचाच. पाच वर्षांपासून तो नोकरीच्या प्रतीक्षेत आहे. म्हाडाच्या परीक्षेत तो प्रतीक्षा यादीत क्रमांक एकवर होता. स्पर्धा परीक्षेत त्याची संधी दोनदा चार गुणांनी हुकली. तलाठी परीक्षेत त्याला दोनशेपैकी १८० गुण मिळाले पण दोनशेपेक्षा जास्त गुण मिळवणारे बघून तो हैराण झालाय.राज्याच्या कोणत्याही भागात गेलो, तरी असे कितीतरी गणेश आणि लखन भेटतात. लाखोच्या संख्येत असलेली ही तरुणाई सध्या अस्वस्थतेचे ओझे घेऊन जगतेय. त्यामागचे एकमेव कारण म्हणजे परीक्षेत होणारे गैरप्रकार. करोना काळानंतर झालेल्या आरोग्य खात्यातील भरतीपासून हे ग्रहण लागले. त्यानंतर राज्यात आठ परीक्षा झाल्या. त्यातल्या पाच परीक्षांत पेपर फुटले, सामूहिक कॉपी झाली. यातली बहुतांश प्रकरणे उघडकीला आणली ती याच विद्यार्थ्यांनी. मग ते अहमदनगर असो, संभाजीनगर असो वा मुंबई, पिंपरी चिंचवड, बीड, नागपूर ठिकठिकाणचे गैरप्रकार याच विद्यार्थ्यांनी उघडकीस आणले होते.परीक्षा जाहीर झाल्यावर तयारी करायची, कसून अभ्यास करायचा. ती दिली की जिथे कुठे गैरप्रकार घडल्याचे कानावर आले असेल तिथे समूहातील एक–दोघांनी धाव घ्यायची. त्यांच्या तिकीट खर्चासाठी इतर सर्वांनी वर्गणी गोळा करायची. गैरप्रकार कसा घडला ते शोधल्यावर पोलीस ठाणे गाठायचे. तक्रार द्यायची. गुन्हा दाखल झाला की माध्यमांकडे धाव घ्यायची. बातम्या प्रकाशित झाल्या की आंदोलने करायची. नेहमीप्रमाणे सरकारने लक्ष दिले नाही की निराश व्हायचे. काही दिवस याच अवस्थेत काढल्यावर पुन्हा मनाला उभारी देत नव्या परीक्षेच्या तयारीला लागायचे राज्यातील सुमारे तीस लाख तरुण याच चक्रात अडकले आहेत. परीक्षार्थीही तेच आणि जागल्याच्या भूमिकेतही तेच. या तरुणांचा कुणीही नेता नाही. राहुल कवठेकर आणि नीलेश गायकवाड हे माध्यमांना या विषयावर प्रतिक्रिया देतात म्हणून ते चर्चेत आहेत. प्रत्यक्षात तेही परीक्षार्थीच. या तरुणांची लाखाच्या घरातील संख्या बघून राजकारणी आणि त्यातल्या त्यात विरोधी पक्षांचे नेते या समूहाकडे राजकीय आशेने आकर्षित झाले आहेत. पण त्यांचा सहभाग केवळ आंदोलनापुरता असतो.

# हुकुशाहाच्या टाचे खाली ७४ वा प्रजासत्ताक दिन ?.

२६ जानेवारी हा भारताचा ७४ प्रजासत्ताक दिन आहे.७५ व्या वर्षात आपण प्रवेश करणार आहोत.प्रजासत्ताक दिन हा आपला राष्ट्रीय सण आहे.त्याबाबत प्रत्येक भारतीयाला अभिमान असायला पाहिजे.आणि काही नां तो आहे. म्हणूनच भारतातील प्रत्येक वाडी-वस्ती,गाव,विभाग,मोहल्ला,तालुका,जिल्हा, शहर,राज्य,आणि राष्ट्रात सर्वत्र प्रजासत्ताक दिन मोठ्याउत्साहाने साजरा केला जातो.ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला वंदन केले जाते. २६ जानेवारी १९५० रोजी भारत देश प्रजासत्ताक झाला. म्हणजे काय झाले? तर त्या दिवसापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या व देशाला अर्पण केलेल्या संविधाना नुसार देशाचा राज्य कारभार सुरु झाला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दोन वर्ष अकरा महिने अठरा दिवस लागले. त्यासाठी २,९६,७२९ रुपये एकूण खर्च आला दररोजचा जमा खर्च त्यांनी लिहून ठेवला.२५ नोव्हेंबर १९४९ ती लिहलेली घटना सादर करण्यात आली त्या संविधानाची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० पासून सुरु झाली.त्यालाच प्रजासत्ताक दिन म्हणतात.तोच प्रजासत्ताक दिन आत हुकूमशाहाच्या टाचे खाली आपण उघड डोळ्याने पाहत आहोत.




हा दिन कोणामुळे सुरु झाला? भारतीय संविधानामुळे.भारतीय संविधान कोणामुळे निर्माण झाले? डॉ.बाबासाहेब आंबेडकरांमुळे.मग,ज्यांनी संविधान लिहिले त्यांचे स्मरण प्रजासत्ताक दिनी या देशाला झालेच पाहिजे. त्यांना संपूर्ण देशाने वंदन आणि अभिवादन केलेच पाहिजे. परंतु तसे होताना दिसत नाही. प्रजासत्ताक दिनी जो संविधानाला मान, तोच मान संविधान निर्मात्याला,जन्मदात्याला,घटनेच्या शिल्पकाराल दिलाच पाहिजे. म्हणून भारतातील प्रत्येक नागरिकांनी, प्रत्येक राजकीय पक्षांनी व नेत्यांनी,प्रत्येक संस्था-संघटनांनी,शाळा-कॉलेजानी आणी मंडळांनी संविधानाच्या शिल्पकाराला,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आदराने आणि अभिमानाने अभिवादन केलेच पाहिजे. जेथे जेथे राष्ट्राध्वजारोहण करून प्रजासत्ताकदिन साजरा केला जातो तेथे तेथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमांचे पूजन करून प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात यावा.आज पर्यंत तसे कोणी केले नसेल.आता पासून आपण करूया.ज्यांनी केले व जे करीत आहेत, त्यांचा साथ देऊन संख्या वाढवू या. जिसकी संख्या भारी उतनी उसकी भागेदारी ही दाखवून द्यावे लागेल.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमांचे पूजन करूनच प्रजासत्ताक दिन साजरा करा, काही ठिकाणी अशी प्रथा सुरु झाली आहे आता आपण सुरु करूया,शासन सुरु करील याची वाट पाहत बसू नये. डॉ.बाबासाहेबां बद्दल शासनाला नेहमीच उशिराच जाग येते. म्हणून आपण जागे राहूया आणि शासनाला जागे करूया. आपण केले कि तो शासनाला निर्णय घ्यावाच लागतो. इंदू मिलचे आंदोलन आपणच केले ना? मग शासनाला जाग आली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या भारताचे संविधान लिहून पूर्ण केले व देशाला अर्पण केले. ज्या दिवशी संविधान देशाला अर्पण करण्यात आले तो २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' आणि ज्या दिवसापसुन संविधांची अंमलबजावणी सुरु झाली तो २६ जानेवारी हा 'प्रजासत्ताक दिन '. २००८ पासून महाराष्ट्र शासनाने जीआर काढून २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा करण्यात सुरुवात केली. तेव्हापासून संपूर्ण राज्यात २६ नोव्हेंबर रोजी शासकीय स्तरावर संविधान दिन साजरा करण्यात येतो. आता शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रजासत्ताक दिन साजरा करावा. असा जीआर काढावा. शासन करील तेव्हा करील.आपण मात्र आता पासून सुरुवात करू आणि डॉ.बाबासाहेब किती मोठे ही जगाने मान्य केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मोठेपण यादेशातील जातीयवाद्यांना खुपते आहे. म्हणून तर ते नेहमी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अनुल्लेख टाळतात. अनेक गोष्टींचा खोटा इतिहास सांगतात. डॉ.बाबासाहेबांबद्दल त्यांना खरा इतिहास सांगता येईना. कारण डॉ.बाबासाहेबांनी खरा इतिहास लिहून ठेवला व नवीन इतिहास रचला. त्याचे जतन करण्यासाठी जनता जागृत असली पाहिजे.म्हणून तर ते डॉ.बाबासाहेबांचा अनुल्लेख टाळतात किंवा ज्या दिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मोठेपण,महत्व आणि कर्तत्व सिद्ध करण्याचा दिन आहे, त्याच दिवशी हे जातीयवादी कपट कारस्थानाणे नवीन सण किंवा नवीन धार्मिक प्रथा सुरु करतात. हेतु हाच की त्यादिवशी डॉ.बाबासाहेबांच्या मोठेपणाकडे किंवा कर्तुत्वाकडे लोकांचे लक्ष जाऊ नये किंवा लोकांना कळू नये.उदाहरण द्यायचे झाले तर २६ जानेवारीचे देवूया. गेल्या ८ ते ९ वर्षापासून २६ जानेवारी रोजी म्हणजेच प्रजासत्ताकदिनी सत्य नारायणाच्या महापूजा घालण्यात येवू लागल्या आहेत. या पूजांचे एवडे अवडंबर माजले आहे कि, प्रत्येक गल्लीत हि पूजा होवू लागली आहे.यापूर्वी २६ जानेवारी रोजी का सत्यनारायणाची पूजा घातली जात नव्हती? आणि आताच ती का घालण्यात येते? कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महत्व त्यांना वाढू द्यायचे नाही किंवा कमी करायचे आहे. सत्यनारायणाच्या महापूजेचा आदेश दिला कोणी? व आला कुठून? तर तो थेट नागपूरच्या हेडक्वार्टर हून आला. कुणाला कळाले नाही. कुठेही गाजावाजा नाही. पण अंमलबजावणी मात्र सर्वत्र होत आहे.सरकारी कार्यालय,शाळा,कॉलेज मध्ये प्रजासत्ताक दिनी सत्यनारायण महापूजेचे महत्व वाढत आहे,वाढवीले जात आहेत. म्हणून भिमानुयायांचीही जबाबदारी वाढत आहे. त्यांनी डॉ. बाबासाहेबांचे महत्व गर्जत आणि गाजत सांगितले पाहिजे. प्रजासत्ताक दिनी डॉ.बाबासाहेबांच्या प्रतिमांचे पूजन करून प्रजासत्ताक दिन साजरा केला पाहिजे.राष्ट्रध्वज हातात घेवून डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमांच्या मिरवणुका काढल्या पाहिजेत.जातीयवाद्यांना डॉ.बाबासाहेबांचा खोटा इतिहास सांगता येत नाही. म्हणून ते डॉ.बाबासाहेबांचे महत्व कमी करू लागले आहेत.डॉ.बाबासाहेबांनी संविधान लिहिलेच नाही असे त्यांना सांगता येत नाही.म्हणून ते आता सांगू लागले आहेत कि,भारताचे संविधान हे काही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एकट्याने लिहिले नाही.सात जणांच्य घटना समितीने लिहिले आहे.तेंव्हा आंबेडकरवाद्यांनी त्याच वेळी,तिथल्या तिथेच एका क्षणाचाही विलंब न लावता ठणकावून ठाम पणे सांगितले पाहिजे की, होय,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी एकट्यानेच भारतीय संविधान लिहिले आहे.तेच संविधानाचे शिल्पकार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर,एन.गोपालस्वामी अय्यंगार,डी.पी. खेतान, कृष्णास्वामी अय्यर, बी.एल.मित्तल,के.एम.मुन्शी व सय्यद अहमद अब्दुल्ला हे सात विद्वान घटना मसुदा समितीचे सदस्य होते. घटना मसुदा समिती व घटना समिती या वेगवेगळ्या होत्या.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे घटना मसुदा समितीचे अध्यक्ष होते,तर डॉ.राजेंद्र प्रसाद हे घटना समितीचे अध्यक्ष होते. मूळ घटना समिती १९४६ साली (स्वतंत्र्यपूर्व) स्थापन करण्यात आली. त्यात एकूण ३८९ सदस्य होते तर स्वतंत्र्यानंतर १९४७ साली (स्वतंत्र्योत्तर) फाळणीनंतर स्थापन करण्यात आलेल्या घटना समितीत २९९ सदस्य होते.असे असले तरी घटना बनविण्याची अत्यंत महत्वाची पण तितकीच कठीण जबाबदारी घटना मसुदा समितीवर होती. सात विद्वानांच्या घटना मसुदा समितीतील दोघेजण परदेशात गेले.अन्य दोघे सतत आजारी असल्यामुळे बैठकांना येत नव्हते. एकचे निधन झाले व एकजण स्वत:च्या कार्यात व्यस्त होता. उरले फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर.त्यांनीच एकट्याने रात्रंदिवस राबून स्वत:च्या आजाराची पर्वा न करता भारताचे संविधान लिहिले. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हेच संविधानाचे एकमेव शिल्पकार आहेत. म्हणून आपण कुठे ही आणि केव्हा ही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख करताना, 'भारतीय संविधानाचे एकमेव शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर', असाच उल्लेख केला पाहिजे.कारण डि.लिट. कोणी ही मिळवू शकतो किंवा भारतरत्न किताब कोणाला ही मिळू शकतो.मात्र संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरच.अन्य कोणालाही होता येणार नाही.म्हणून प्रजासत्ताक दिन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करूनच साजरा करावा !.



लोकशाहीचे बोट पकडून काही लोक आज सत्ताधारी झाले आहेत. त्यांनी लोकशाहीची हत्या करून उघड उघड हुकूमशाही राबविण्यास सुरवात केली आहे.अशा वेळी आंबेडकरी विचारधारा मानणाऱ्या समाजाची जबाबदारी मोठी आहे. त्यांनी मी मोठा तू मोठा असे करत बसण्या पेक्षा ज्यांच्या मागे खऱ्या अर्थाने जनमत आहे त्यांच्या सोबत उभे राहिले पाहिजे.तरच आताच्या परिस्थितित मनुवादी मानसिकतेला आपण टक्कर देऊन उभे राहू शकतो.अन्यता गुलामगिरी आपणच लाधून घेण्यास जबाबदार असणार आहोत. दुसऱ्यांना दोष देता येणार नाही. प्रजासत्ताक दिनाचा अर्थ आपणास समजला असेल तर तश्या पद्धतीने आपणास वागावे लागेल.व्यक्तीगत,राजकीय गट बाजीचे मतभेद बाजूला ठेऊन सर्व समाजाने संघटित झाले पाहिजे आणि राजकीय पर्याय दिला पाहिजे. तरच भारतात प्रजासत्ताक सरकारे निवडून येतील.अन्यता ई व्ही एम मशीन द्वारे सर्व सरकारी यंत्रणा हुकुशाहाच्या टाचे खाली असल्यामुळे प्रजेला निपक्षपाती न्याय मिळणे अशक्य आहे.त्यासाठी प्रजासत्ताक दिनाच्या तीन दिवस अगोदर २२ जानेवारील जय श्रीराम चे वादळ निर्माण करण्यात आले आणि त्यात संपूर्ण देश वाहून गेला. वरुण जरी वादळ शांत वाटत असेल पण आत प्रचंड असंतोष आहे तो अजून शांत झालेला नाही. तो लोकसभेच्या निवडणूकी पर्यन्त घोंघावत राहील. याची सर्वच भारतीयांनी काळजी घ्यावी. आणि सर्व जाती धर्माच्या लोकानी शांत राहावे यातच सर्वांचे हित आहे. म्हणून ७४ वर्षाचा प्रजासत्ताक दिन अर्थपूर्ण समजून साजरा करावा. ७४ व्या प्रजासत्ताक दिनाच्या सर्व भारतीयांना हार्दिक शुभेच्छा.

*************

सागर रामभाऊ तायडे,
९९२०४०३८५९.
भांडुप,मुंबई.

# लोकशाही कडून धार्मिक भांडवलशाही कडे...

आम्ही भारताच्या लोकांनी लोकशाहीचा स्विकार करून प्रत्यक्षात लोकशाही २६ जानेवारी १९५० रोजी अमंलबजावणी सुरू केली. लोकशाही अर्थात प्रजासत्ताक म्हणजे सरळ सरळ प्रजा अर्थात लोकांचे सरकार. आम्ही दरवर्षी शासकीय पातळीवर २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन साजरा करतो. परंतु प्रजासत्ताक व्यवस्था येथे खरचं निर्माण झाली का याचा विचार विनीमय, समिक्षा करतो का? प्रजासत्ताक दिन साजरा करणे आणि राष्ट्रप्रजासत्ताक असणे यामध्ये खुप मोठा फरक आहे. आम्ही लोकशाही स्विकारून आता पंचेहत्तर वर्षे झाले आहेत. पंचेहत्तर वर्षात लोकशाही ची जाळेमुळे खऱ्या अर्थाने सर्वसामान्य लोकां पर्यंत पोहचले का चिंतेचा विषय आहे. अजूनही देशातील सुशिक्षित लोकांना लोकशाही चा अर्थ व गांभीर्य कळाले नाही. लोकशाहीचे समृद्ध फळे सर्व सामान्य लोकांना चाखता आली का? याचा प्रामाणिक विचार कोणी व कधी केला का? लोकशाही चे फायदे काय व ते लोकांना मिळाले का? असे अनेक प्रश्न लोकशाही पंचेहत्तर वर्षाची झाली असताना ही उपस्थित आहेत. लोकशाही चे म्हणजे देशातील असलेल्या सर्व व्यवस्था लोकांच्या हिताचे काम करतील. त्यामध्ये ग्रामपंचायत सचिवापासुन तर मंत्रालयीन सचिवापर्यंत, सरपंचापासुन तर प्रधानमंत्री पर्यंत सर्व जन लोक सेवक आहेत. यांनी लोकांची सेवा करणे अपेक्षित आहे. लोकांना वेगवेगळ्या माध्यमातून लोकहीताच्या योजना, जनतेचा सहभाग होऊन सामुदायिक विकासासाठी वेगवेगळे विभाग व त्यांचे कर्मचारी अधिकारी लोक सेवकच आहेत, सर्व शासकीय यंत्रणेचा मुख्य उद्देश जनतेची सेवा करून जनतेच्या अडचणी सोडवून जनतेला समृद्ध करून देशाच्या विकासाला हातभार लावणे हाच होय. परंतु लोकशाही ज्यांच्या मार्फत पेरण्याचे काम व्हायला पाहिजे होते त्याच लोकशाही च्या सेवकांनी घर भरण्याचे काम केले आहे. जनता वाऱ्यावर सोडून जनतेच्या वाट्याचे ज्याला खाता येईल त्याने खाण्याचा प्रयत्न केला. लोकशाही मध्ये लोककल्याण होण आवश्यक असताना लोकच समस्या ग्रस्त आहेत. वेगवेगळ्या माध्यमातून लोकांच्या हक्क अधिकार यांच्या वर मर्यादा आनुन जनतेला च वेठीस धरले जाते व जनतेच्या लुटारूंना मोकळे सोडले जाते. जनतेची लुट फक्त राजकारणीच करतात असे नाही. राजकारणी मोठ्या प्रमाणात करतात हे खरे असले तरी लोकांची प्रत्यक्ष लुट हि इतरांकडून ही होते. लोकांचे हक्काचे काम करण्यासाठी लोकांची आर्थिक पिळवणूक केली जाते, काही ठिकाणी जात बघुन ओळख बघुन काम केले जाते हे ही जनतेची लुटच आहे. भारताची लोकशाही जनमाणतात का जाऊ दिली नाही याचे सर्वात महत्वाचे कारण आहे ते म्हणजे भारतीय संविधान व लोकशाही ने प्रत्येक माणसाला समान संधी, सन्मान, हक्क अधिकार बहाल करून हजारो वर्षांपासून अज्ञानात खितपत पडलेल्या, विषमतावादी व्यवस्थेने जाणीव पुर्वक दूर्लक्षीत ठेवलेल्या समुहाला सुद्धां राजा बनवले. आणि हीच गोष्ट हजारो वर्षांपासून स्वतः ची व्यवस्था स्थापन करून लोकांचे शोषण करणाऱ्यांना पचली नाही. संविधाना अगोदर देशात लोक एवढे विद्वान आणि व्यवस्था एवढी संस्कारक्षम होती की माणसाच्या सावलीचा बाट होत होता, माणसासोबत जेवन, बसने उठने दुरच बोलनेही पाप वाटत होते. लोकांना लोकांच्या पाऊल खुनांचाही बाट होत होता. सार्वजनिक ठिकाणी कुत्रे, गायी, बैल म्हैस यांना वावरता येत होते पण माणसाला बंधी होती. असे गलिच्छ व तुच्छ विचार असलेल्या लोकांनी आपली व्यवस्था निर्माण केली होती. हीच व्यवस्था संविधानाने उधळून लाऊन समता, बंधुता, समान न्याय, संधी सार्वजनिक संपतीचा समान उपभोग हे सर्व बहाल केल्याने विषमतावादी व मेंदु नसलेल्या लोकांचे महत्त्व कमी झाले नाही परंतु त्यांच्या सोबत इतर आले आणि हेच दुखणे सहन होत नाही म्हणून लोकांना लोकशाही व संविधान कळूच दिले गेले नाही. संविधानाने प्रत्येक माणसाला विषेश महत्व देऊन जात धर्म यावरून भेदभाव व विषमता संपुर्ण पणे नाकारली आहे. धर्म ही प्रत्येकाची खाजगी बाब असून प्रत्येकाला प्रत्येकाच्या धर्मानुसार आचरण व उपासना करण्याचा अधिकार आहे. लोकांचे कल्याण करण्यासाठी, कल्याणाचे निर्णय घेण्यासाठी, लोकांचे प्रश्न मांडून उपाय शोधण्यासाठी देश पातळीवर संसद व राज्य पातळीवर राज्य विधीमंडळ आहे. प्रत्येक नागरिकांच्या समस्या सोडवणे, मांडणे हे याच ठिकाणी होते. म्हणजे राज्य विधीमंडळ व संसद हे जनतेच्या कल्याण करणारे आणि कोणताही भेद नसलेले महत्वाचे ठिकाण आहेत. मताधिकाराच्या माध्यमातून येथे जनतेचे प्रतिनिधी जनतेच्या वतीने समस्या मांडून त्या दुर केल्या जातात. परंतु सध्या लोकशाही ला पायदळी तुडवून लोकांना धर्माच्या नावावर लढवले जाते व धर्मांचे भांडवल करून त्यातून निवडणुक घेतली जाते. म्हणजे निवडणुकीत मुद्दे हे शिक्षण, रोजगार, महागाई, आरोग्य सुविधा, कृषी माल भाव, विद्यार्थ्यांसाठी, महिला यांच्या साठी केलेले काम हे पाहिजे पण निवडणूक जवळ आली की धर्माला भांडवल बनवून लोकांच्या समस्या बाजूला सारून राजकारण केले जाते. धर्मांधता आणि भांडवलशाही लोकशाही साठी घातक असते. भारतात तर एवढी कठीण परिस्थिती निर्माण करून ठेवली की लोकांना धर्मांध तर बनवलेच पण धर्माला भांडवल बनवून राजकीय सत्तेची झोळी भरून घेतली जाते. आणि धार्मिक स्थळांचे भांडवल बनवून विशिष्ट लोकांच्या हजारो पिढ्यांच्या कमाईचे साधन उपलब्ध करून दिले जाते. सर्व सामान्य मानुस धर्माच्या नावासाठी काहीही करायला तयार आहे. कारण त्याला रोजच एकच ऐकवले जाते की धर्म धोक्यात आहे. परंतु शिक्षण, आरोग्य, नोकरी आणि इव्हिएमच्या माध्यमातून लोकशाही धोक्यात आहे याबद्दल कधीच प्रबोधन होऊ दिले जात नाही. सरकारचे चुकीचे ध्येय धोरणे, शिक्षण, रोजगार, इव्हिएम आणि लोकांना धर्मांध बनवून एकाच जातीच्या लोकांच्या पिढ्यानपिढ्या च्या कमाईला विरोध करणारे लोक धर्मांध लोकांना धर्म विरोधी वाटतात. शिक्षण, रोजगार, आरोग्य यावर खर्च करायला पैसे नसलेल्या देशात हजारो करोडोचे मंदिर उभे राहतात, हजारो करोडो रूपये जाहिरात वर खर्च केले जातात आणि पुजारी व ट्रस्टीच्या शंभर पिढ्याचे कल्याण केले जाते. लोकशाही मध्ये सार्वजनिक मालमत्ता ह्या सर्वांच्या मालकीच्या असतात. सत्तेत असलेल्या लोकांनी त्यांचे संवर्धन करणे आवश्यक असते. परंतु सार्वजनिक संसाधन जर विकसित झाले तर देशातील शेवटचा घटकही तेवढाच मालक असणार जेवढा की देशाचा प्रधानमंत्री असेल. म्हणून तळागाळातील, संख्येने कमी, शिक्षणाने कमी व सामाजिक विकासापासुन दुर ठेवलेल्या लोकांना देशातील संपतीचा फायदा होऊन त्यांचे कल्याण होऊच नाही म्हणून सार्वजनिक संपत्ती खाजगी कंपनीला विकुन देशाला भिकेला लावले जात आहे. सार्वजनिक क्षेत्रातील संपती विकुन त्यामधून आलेल्या पैशाचा फायदा मोजक्याच एकाच वर्णातील लोकांना होत आहे. संविधाना अगोदर बोलण्याचा, शिक्षणाचा, मत व्यक्त करण्याचा, सार्वजनिक ठिकाणी जाण्याचा, सार्वजनिक संपतीचा उपभोग घेण्याचा अधिकार नसताना आम्हाला संविधानाच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाचे मालक बनवले. सर्व सामान्य मानुस देशाच्या मालक बनलेले हेच अजूनही काही लोकांच्या पचनी पडणारे नाही म्हणून प्रत्येक मानसाच्या जिवनाचे सोने करणारे संविधान आणि त्याच संविधानाने दिलेली लोकशाही आहे. परंतु यांचे गांभीर्य व महत्व संविधान विरोधी लोकांनी सर्वसामान्य लोकांना कधी कळूच दिले नाही. लोकांना संविधानाचे महत्व कळून जेव्हा कळेल की प्रत्येक जन या देशाचा मालक आहे. सार्वजनिक संपतीवर सर्वांचा सारखाच हक्क आहे, आणि लोकांचे कल्याण करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे संविधान आहे. त्या दिवशी देशात क्रांती होईल. त्या दिवशी लुटारू राजकीय नेत्यांचे धर्मांचे भांडवल काम करणार नाही. परंतु विषमतावादी लोक सध्या तरी लोकशाही ला चुकीच्या पद्धतीने नेऊन धर्माच्या नावावर लोकांना भावनिक बनवून धर्माचा वापर राजकीय झोळी व पुजाऱ्याची झोळी भरून घेण्यासाठी करत आहेत. संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की संविधान कितीही चांगले असले आणि ते राबणारे लोक जर योग्य नसतील तर संविधानाचा उपयोग होणार नाही. आज तीच परिस्थिती आली आहे. हजारो वर्षापासून अंधविश्वास, अज्ञान, काल्पनिक कथा, अनिष्ट रुढी परंपरा यांच्या माध्यमातून मानसिक गुलाम बनलेल्या लोकांना संविधानाने शिक्षण, नोकरी, हक्क अधिकार, विज्ञान, समान संधी देऊन जिवनाचे सोन करून सोन्यापेक्षा जास्त महत्त्व माणसाला निर्माण करून दिले. आमदार खासदार, मंत्री राष्ट्रपती बनवले. प्रत्येकांच्या मानसिक स्वांतत्र्याचा व प्रगतीचा एकमेव मार्ग म्हणजे संविधान, संविधानाला पंचेहत्तर वर्षे पुर्ण होत आहेत अमृतमहोत्सव येऊनही संविधाना प्रती व लोकशाही प्रती लोकांचा उत्साह दिसुन येत नाही. कारण लोकशाही ला दाबुन धार्मिक भांडवलशाही उदयास आली आहे. सर्व सामान्य लोकांचा वापर करून पुजाऱ्यांचे पोट भरण्याचे काम सतत होत असते. शासकीय नियम आहे औपचारिकता म्हणून प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो. बऱ्याच लोकांना प्रजासत्ताक दिन साजरा करताना भारतीय संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नावही घेण्याची लाज वाटते. कारण आजही हजारो वर्षाचे चुकीचे संस्कार असलेले व मानसाला माणूस न समजणारे लोक खुप आहेत. ते.लोक खुप मोठ्या संख्येने असले तरीही सर्व सामान्य जागृत व्यक्तीला स्वाभिमान, सन्मानाने आणि स्वतः चे परखड व स्पष्ट मत मांडण्याचा, सरकारच्या चुकीच्या ध्येयधोरणावर बोलण्याचा, धर्म खाजगी बाब आहे परंतु काही लोक जाणीव पुर्वक सार्वजनिक ठिकाणी धर्माची मांडणी करत असतील तर त्याला विरोध करण्याचा, आणि देशभर एक भारतीय मिरण्याचा अधिकार संविधानाने दिलेला आहे. आणि धार्मिक भांडवलशाही चे स्तोम माजत असताना संविधानाने दिलेले मुलभूत अधिकार हे शस्त्र म्हणून काम करत आहेत. म्हणून विषमतावादी लोकांनी लोकशाही ची कीतीही तोडफोड करण्याचा प्रयत्न केला तरी ही जागृत लोकांनी मात्र लोकशाही व संविधाना बद्दल प्रबोधन करणे कमी करू नये हिच अपेक्षा. ज्यांना बोलण्याचा, लिहण्याचा, नोकरी करण्याचा, निवडणूक लढण्याचा, मताधिकार बजावण्याचा, वडील व पतीच्या संपतीत वाटा माघण्याचा, कुठेही फिरण्याचा, प्रसुती रजा घेण्याचा, मंदिर,संसद, गार्डन, सिनेमागृह, हॉटेल मध्ये जाण्याचा, धर्माच्या नावावर घोषणा देण्याचा, पूजा अर्चा करण्याचा, धार्मिक स्थळांमध्ये जाण्याचा जो अधिकार आहे तो फक्त आणि फक्त भारतीय संविधान व त्याचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळेच. म्हणून वरिल संविधानाच्या लाभार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या सदिच्छा...

**************

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

# तरुणांनी कौशल्याधिष्ठित आणि रोजगाराभिमुख शिक्षण घ्यावे संचालक सुरज मांदळे




लातूर :- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी काळाची पावले ओळखून कौशल्याधिष्ठीत आणि रोजगाराभिमुख शिक्षण आणि प्रशिक्षण घेतले पाहिजे असे प्रतिपादन स्किल अकॅडमीचे संचालक सुरज मांदळे यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात समाजकार्य आणि वाणिज्य विभाग द्वारा आयोजित करियर मार्गदर्शन कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारपीठावर वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, समाजकार्य विभाग प्रमुख दिनेश मौने, वाणिज्य विभाग प्रमुख विजयकुमार सोनी, प्रा. के. यु. पवार, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, प्रा. विजयकुमार धायगुडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर, सुभाषचंद्र बोस आणि हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना सुरज मांदळे म्हणाले की, आजच्या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी कौशल्य, शिक्षण अ प्रशिक्षणाची अत्यंत गरज आहे. उद्योग, नोकरी, रोजगार, सेवा या क्षेत्रात नित्य नवे बदल घडून येत आहेत. काळ झपाट्याने बदलत असल्यामुळे नवे तंत्रज्ञान अवगत करून स्वतःला नेहमी अपग्रेड करण्याची गरज आहे. आत्मविश्वास आणि चिकाटीही महत्वाची असते असेही ते म्हणाले. यावेळी कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले, डॉ. दिनेश मौने यांनी समायोजित मनोगते व्यक्त केली. यावेळी बोलताना डॉ. राजकुमार लखादिवे म्हणाले की, सध्या स्टार्टअप आणि स्टँडअपचा काळ आहे. समाज जीवनामध्ये विविध क्षेत्रात अनेक सेवा संधी उपलब्ध आहेत. काळानुरूप त्या त्या क्षेत्रातील कौशल्य प्राप्त केल्यास यश आपोआपच संपादन होते असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजयकुमार सोनी यांनी केले. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, पारंपारिक चौकटीतील शिक्षणापेक्षा कौशल्याधिष्ठित शिक्षणावर अधिक भर देणे गरजेचे आहे. विशिष्ट क्षेत्रातील कौशल्य प्राप्त करून त्यासोबतच रोजगार संयुरोजगार उद्योग या विश्वात यशस्वी व्हायचे असल्यास संवाद कौशल्य, भाषण कौशल्य, लेखन कौशल्य, मुलाखत कौशल्य तंत्र अवगत करणे ही काळाची गरज बनली आहे असेही ते म्हणाले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राहुल डोंबे यांनी केले तर आभार प्रा. के. यू. पवार यांनी मानले. या कार्यक्रमाला समाजकार्य आणि वाणिज्य विभागातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने होते.

# धर्मांध शक्तीच्या विरोधात उतरून संविधान वाचविण्यासाठी मतदारांनी प्रयत्न करावा..! ब्युरो चीफ रवि ढवळे राष्ट्रीय मतदारदिन उत्साहामध्ये साजरा...



नवी मुंबई / के. एच. हनवते :- ( दिघा ) सध्या देशात धर्मांध शक्तीने डोके वर काढले आहे ते जर आपल्या खाली करायचे असेल तर मग आपणास भारतीय संविधान वाचविण्यासाठी येणाऱ्या काळात मतदारांनी आपल्या माताच्या माध्यमातून प्रयत्न करावे लागणार असल्याचे दैनिक सुपर भारतचे नवी मुंबई ब्युरो चीफ रवि पांडुरंग ढवळे सर यांनी आपल्या मनोगतामध्ये विचार मांडले. बालाजी सावळे यांच्या पक्षीय कार्यालयात राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने बालाजी सावळे यांच्यातर्फे त्यांच्या कार्यालयात मोफत मतदार नोंदणीचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. त्यास नागरीकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. सदर कार्यक्रमाला नगरातील सर्व मान्यवर उपस्थित होते. त्यात प्रामुख्याने रवि पी. ढवळे सर, जेष्ठ समाजसेवक बि.आर. सावळे, प्रशांत गायकवाड, अर्जुन नांदुरे, लक्ष्मण कावळे, रोशन मोरे, सहभागी होते. त्याचप्रमाणे कार्यक्रमाला महिलांचा सहभाग ही जास्त प्रमाणात होता. समाजसेविका अर्चना सावळे, पुष्पा चौहान, रंजना शेंडे, मंजू सिंग, अंजू यादव, सुनिता सरोज, संजू यादव यांचा सहभाग होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुलदीप कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन शुभम सुर्यवंशी यांनी केले.

# उल्हासनगर मध्ये मॅक्सीलाईफ न्युरोलॉजिस्ट हॉस्पिटल बनले वरदान

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर शहरात जानेवारी २०१९ मध्ये सुरु झालेले मॅक्सीलाईफ हॉस्पिटल हे न्युरोलॉजिस्ट रुग्णासाठी वरदान ठरले आहे. या रुग्णालयात सर्वच सुविधा उपलब्ध असुन हे रुग्णालय न्युरोलॉजिस्ट म्हणुन एकमेव रुग्णालय आहे. उल्हासनगर कँप ३ येथील शांतीनगर परिसरात मॅक्सी लाईफ न्युरोलॉजिस्ट रुग्णालय हे जानेवारी २०१९ मध्ये सुरु झाले असुन या रुग्णालयाने कोविड मध्ये उत्तमरित्या काम केले आहे. हे रुग्णालय न्युरो रुग्णासाठी असल्याने येथील रुग्णाना पुढील उपचारासाठी मुंबईला जाण्याची गरज पडत नाही. या रुग्णालयात अत्यंत अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असल्याची माहीती रुग्णालयाचे व्यवस्थापक डॉ. विवेक अग्रवाल यांनी पत्रकाराना दिली आहे. दरम्यान या रुग्णालयात वैद्यकिय तंत्रज्ञान आणि रुग्ण केंद्रित काळजी यांच्या सीमाना सातत्याने पुढे आरोग्यसेवा देत आहे. हे रुग्णालय हेल्थकेयर इनोव्हेशनमध्ये अग्रगण्य , एक न्युरोमिक्रोस्कोपिक मशीनच्या परिचयासह न्युरोक्रिटीकल केयरमध्ये महत्वपूर्ण कामगिरी करत असल्याचे डॉ . विवेक अग्रवाल यांनी सांगितले आहे. दरम्यान या रुग्णालयाने पाच वर्ष पुर्ण केले असुन हे रुग्णालय शहरात चांगली सेवा देत आहे. हे एकमेव रुग्णालय उल्हासनगर मध्ये असल्याने आजुबाजुच्या शहरातील रुग्ण सुध्दा या रुग्णालयात उपचारासाठी येत आहेत.

# लातूर राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमात राज्यात पुन्हा पहिला ; नोव्हेंबर महिन्याची क्रमवारी जाहीर

लातूर दि.२५(जिमाका) राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडून गेल्या काही महिन्यापासून राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबविण्यासाठी जिल्ह्याला गुण दिले जात आहेत. नोव्हेंबरचे गुणानुक्रम नुकतेच जाहीर झाले असून त्यात लातूर जिल्ह्याला राज्यात सर्वाधिक ४७.७३ एवढे गुण मिळाले असून जिल्हा राज्यात पहिला आला आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांच्या मार्गदर्शनखाली केलेल्या कार्याची ही पावती असून हे सेवा सातत्य ठेवण्याचा आमचा प्रयत्न राहिल अशी माहिती जिल्ह्याचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांनी दिली. राज्यातील आरोग्य विभागाकडून राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमातील माता आरोग्य, बाल आरोग्य, कुटुंब नियोजन, क्षयरोगदुरीकरण, ज्येष्ठाच्या आरोग्याची काळजी, यासह प्रशासनातील बाबीही या गुणांकनात गृहीत धरल्या जातात.

# उल्हासनगर महापालिकेकडुन मराठी पाट्या न लावणाऱ्या दुकानदांरावर कारवाई सुरु

उल्हासनगर : उल्हासनगर महापालिकेने शहरातील दुकानंदाराना मराठी पाट्या लावन्या संदर्भात नोटीसी बजावुन २५ जानेवारीच्या आत मराठी पाट्या लावन्याच्या सुचना दिल्या होत्या. परंतु काही दुकानदांरानी पाट्या बदली केल्या नसल्याने आज महापालिकेने दंडात्मक कारवाई सुरु केली आहे . त्यामुळे दुकानंदारामध्ये एकच खळबळ उडाली आहे. उल्हासनगर शहरातील दुकानदांरानी मराठी पाट्या लावन्यासाठी मनसेने आक्रमक भूमिका घेतली होती. तर सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाला निर्देश देवुन मराठी पाट्या लावन्याच्या सुचित केले होते. तेव्हा उल्हासनगर महापालिकेने शहरातील दुकानदार व इतर आस्थापना यांना मराठी पाट्या लावन्या बाबत नोटीसी बजावल्या होत्या. त्या नोटीसी मध्ये २५ जानेवारी च्या आत पाट्या बदलन्याच्या सुचना दिल्या होत्या . परंतु काही दुकानंदारानी मराठी पाट्या लावल्या नाहीत . त्यामुळे आयुक्त अजिज शेख यांच्या आदेशाने महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली , नोडल अधिकारी गणेश शिंपी. मुख्य बाजार निरीक्षक विनोद केणे.जेठानंद , दत्तात्रय जाधव , अनिल खतुरानी यांनी मराठी पाट्या न लावणाऱ्या दुकानदांरावर दंडात्मक कारवाई सुरु केली आहे.

# _लातूर मध्ये राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात संपन्न जगातले सर्वाधिक तरुण भारतात त्यामुळे लोकशाही प्रक्रियेमध्ये युवकांचा सहभाग महत्वाचा - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे






लातूर दि.२५(जिमाका)- जगातले सर्वाधिक तरुण भारतात आहेत. एका अर्थाने भारत हा तरुणांचा देश आहे. लोकशाही प्रक्रियेत मतदान ही सर्वात महत्वाची प्रक्रिया आहे, त्यात युवकांचा सहभाग असणे महत्वाचे आहे. त्यामुळे एकही युवक - युवती मतदार नोंदणी पासून वंचीत राहू नये असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांनी केले. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त दयानंद महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे- विरोळे, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड, नगरपालिका प्रशासन सहआयुक्त रामदास कोकरे, शिक्षणाधिकारी नागेश मापारी, तहसीलदार सौदागर तांदळे, प्रा.डॉ. दिलीप नागरगोजे यांच्यासह निवडणूक विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. आपण कुटुंबातले नाते कटाक्षाने सांभाळतांना त्यात कर्तव्य भावना असते. तशीच कर्तव्याची भावना लोकशाही राष्ट्रातील नागरिकांची मतदार नोंदणी, मतदान हे आहेत. याची जाणीव नव मतदार म्हणून पात्र झाले आहेत अशा युवक-युवती मध्ये यावी म्हणून निवडणूक आयोगाच्या वतीने जिल्हा प्रशासन सातत्याने प्रयत्न करत असते. त्या प्रयत्नाचा भाग म्हणजे राष्ट्रीय मतदार दिन असल्याची भावना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांनी यावेळी बोलून दाखविली.जिल्ह्यातील महिला मतदानाचा टक्का वाढला लातूर जिल्ह्यातील महिला मतदानाचे प्रमाण हजार पुरुषांमागे ८८८ एवढे होते. ही गोष्ट जिल्ह्यासाठी भूषणावह नव्हती, हा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने जाणीवपूर्वक प्रयत्न केले. त्याला काही प्रमाणात यश आले असून आता एक हजार पुरुषांमागे ८९८ महिला मतदार आहेत. हा टक्का वाढविण्यासाठी आम्ही अजूनही प्रयत्न करत आहोत. महिला मतदार टक्का वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न केल्याबद्दल उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांचा निवडणूक आयोगाकडून विशेष गौरव केला असल्याची माहितीही यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. यावेळी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल मतदान केंद्रस्तरीय अधिकारी ( बी. एल.ओ ) , तांत्रिक अधिकारी ( ऑपरेटर ), नायब तहसीलदार ( निवडणूक) , महसूल सहायक, तलाठी मंडळ अधिकारी, चुनाव पाठशाळा नोडल अधिकारी, राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या, त्यातील विजेत्यांचा प्रमाणपत्र, गुलाब पुष्प देऊन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. राष्ट्रीय युवा पुरस्कार विजेत्या विधी पळसापुरेचा गौरव नाशिक येथे पार पडलेल्या राष्ट्रीय युवा महोत्सवात देशभरातील युवकांना राष्ट्रीय युवा पुरस्कार देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. त्यात महाराष्ट्रातून आपली लातूरची लेक विधी पळसापुरे हिला राष्ट्रीय युवा पुरस्काराने गौरविण्यात आले. हा पुरस्कार लातूरकरांचाही सन्मान आहे. यामुळे युवकांच्या आयकॉन बनलेल्या विधी पळसापुरे यांचा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांच्या हस्ते विशेष प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी लातूरची कन्या लातूरची बोली महाराष्ट्रभर गाजवणारी युट्यूबर मेघा पवारचाही सत्कार करण्यात आला. लातूर जिल्ह्यातील मतदार नोंदणी करतांना महिला, युवक- युवती , दिव्यांग, तृतीय पंथी यांची नोंदणी वाढली पाहिजे यासाठी विशेष भर देण्यात आला. जे युवक मतदार म्हणून पात्र ठरू शकतात ते जिल्ह्यातील एकूण संख्येच्या तीन टक्के असून त्यातील १.४२ टक्के एवढ्या युवक- युवतीची नव मतदार म्हणून नोंदणी झाली असून बाकीच्या पात्र युवक - युवतीनी मतदार नोंदणी करावी यासाठी आमचा निरंतर प्रयत्न आहे अशी माहिती आपल्या प्रास्ताविकात उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे - विरोळे यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप जगदाळे यांनी केले. कार्यक्रमाचा शेवट दयानंद महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांच्या उत्तम संदेश देणाऱ्या मतदान जनजागृती पथनाट्याने झाली. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त रॅली राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आज जिल्हा क्रीडा संकूलातून भव्य अशी मतदार नोंदणी, मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली. त्यात विविध महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीला सुरुवात झाली.

# क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा दौरा

लातूर, दि. २५ (जिमाका): राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे २६ जानेवारी २०२६ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.ना. बनसोडे हे सकाळी ८.५० वाजता शंकुतला निवासस्थान येथून लातूर जिल्हा क्रीडा संकुलकडे प्रयाण करतील. याठिकाणी सकाळी ९.१५ वाजता त्यांच्या उपस्थितीत ७५ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित मुख्य शासकीय ध्वजारोहण होईल. सकाळी १०.०५ वाजता त्यांच्या उपस्थितीत जिल्हा क्रीडा संकुल येथे ग्रामीण भागातील महिला बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या जिल्हास्तरीय प्रदर्शन व विक्री २०२३-२४ 'हिरकणी हाट'चा उद्घाटन सोहळा होईल. दुपारी १२.३० वाजता ते लातूर येथून मोटारीने उदगीरकडे प्रयाण करतील.उदगीर येथील श्री. गुरु हवागी स्वामी गल्ली येथील श्री सदगुरु संस्थान उदगीरतर्फे हावगी स्वामी महाराज मठ येथे महामंगल आरती व दर्शन कार्यक्रमास दुपारी १.४५ वाजता ना. बनसोडे उपस्थित राहतील. दुपारी ३ वाजता उदगीर तालुक्यातील वाढवणा पाटी येथील विकास माधव केंद्रे यांच्या सरस्वती ऑटोमोबाईल अँड हार्डवेअरच्या शुभारंभ कार्यक्रमास उपस्थित राहतील. दुपारी ४.१५ वाजता ईस्मालपूर येथे इस्माईल खादरी दर्गा उरूस यात्रेस सदिच्छा भेट देतील. सायंकाळी ५ वाजता शेल्हाळ पाटी येथील महाकाल रेडिमिक्स कॉन्क्रेट प्लांटच्या शुभारंभ कार्यक्रमास उपस्थित राहतील. सायंकाळी ६.३० वाजता उदगीर येथून लातूरकडे प्रयाण करतील. सायंकाळी ७.३० वाजता लातूर शहरातील अंबाजोगाई रोडवरील कार्निव्हल रिसोर्ट येथे डॉ. अशोक पोद्दार यांच्या कौटुंबिक कार्यक्रमास उपस्थित राहतील. सोयीनुसार शकुंतला निवासस्थानाकडे प्रयाण करतील.

# भाजपा बूथप्रमुखांना प्रभू श्रीराम मूर्तीचे आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते वाटप




लातूर :- अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरात मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्ताने संपूर्ण देशात राममय वातावरण निर्माण झाले असून ही किमया देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वामुळे झाली आहे. अशा नेतृत्वाला खंबीर साथ देण्यासाठी येणाऱ्या लातूर लोकसभा निवडणुकीत सर्वांनी जिद्दीने जोमाने काम करून भाजपा उमेदवाराला प्रचंड मताधिक्य मिळवून द्यावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

अयोध्येत प्रभू श्रीरामाचे भव्य मंदिर झाले, मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना झाली, अनेकांचे स्वप्न सत्यात उतरल्याने देशभर आनंद उत्सव साजरा करण्यात आला यानिमित्ताने श्रीरामाची घरातही पूजा व्हावी याकरिता भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील सर्व बूथ प्रमुखांना पितळ धातूची प्रभू श्रीरामाची मूर्ती भेट देऊन मिठाई वाटप केली. लातूर येथील संवाद कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास भाजपाचे नवनाथ भोसले, वसंत करमुडे, ॲड. दशरथ सरवदे, बन्सी भिसे, श्रीमंत नागरगोजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बूथप्रमुखाशी संवाद साधताना भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, बूथ प्रमुख ही जबाबदारी छोटी नसून खूप मोठी आहे. बूथ प्रमुखांनी पक्षाच्या आदेशानुसार बुथप्रमुखांनी प्रभावीपणे काम करून प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचावे. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनेच्या लाभार्थ्यांशी सातत्याने संवाद करावा. विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून गोरगरीब सर्वसामान्यांना बारा बलुतेदारांना योजनेचा लाभ मिळवून द्यावा एकूणच प्रत्येकानी आपले बुथ मजबूत करावे.

राम राज्य आणण्याचे काम भाजपा नेतृत्वाने केले असून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने आणि राज्यातील महायुती शासनाने घेतलेल्या विविध निर्णयाची माहिती देऊन येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भाजपाचा उमेदवार विक्रमी मताने निवडून आला पाहिजे. त्यात लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचा सिंहाचा वाटा असावा याकरिता सर्व बूथ प्रमुखांनी मताधिक्य वाढविण्याचा संकल्प करावा असेही आवाहन आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

प्रारंभी नवनाथ भोसले आणि ॲड. दशरथ सरवदे यांनी कार्यकर्त्यांना मान सन्मान देणारे भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड आहेत असे सांगून त्यांच्या माध्यमातून गावागावात वाडी तांड्यात झालेल्या विविध विकास कामाची माहिती दिली. बूथ प्रमुखांनी ५०% पेक्षा अधिक मतदान मिळावे यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE